.. Viththala aaRatii ..

॥ श्री विठ्ठल आरती ॥

ओवाळूं ग माये विठ्ठल सबाह्य साजिरा ।
राईरखुमाबाई सत्यभामेच्या वरा ॥ धृ ॥

कनकाचे पर्येळी उजळोनी आरती ।
रत्नदीपशोभा कैशा प्रकाशल्या ज्योती ॥ ओवाळूं ॥ १ ॥

मंडित चतुर्भुज कानीं शोभत कुंडले ।
श्रीमुखाची शोभा पाहतां तेज फांकले ॥ ओवाळूं ॥ २ ॥

वैजयंती माळ गळा शोभे स्यमंत ।
शङ्खचक्रगदापद्म आयुधें शोभत ॥ ओवाळूं ॥ ३ ॥

सांवळा सुंदर जैसा कर्दळीचा गाभा ।
चरणीईचीं नूपुरें वांक्या गाजती नभा ॥ ओवाळूं ॥ ४ ॥

ओवाळीता मन माझें ठाकलें ठायी ।
समाधिस्थसमान तुकया लागला पायी ॥ ओवाळूं ॥५ ॥

इति

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated January 25, 1999